आवक क्र. ६/२०००
दि. २८/८/२०००

९०३ec

जा.क्र.माध्य-३/प्रथम मान्यता/पुणे/
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे १. यांचे कार्यालय,
दिनांक :-
22 AUG 2000

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे.

विषय :- प्रथम मान्यता

श्री. समर्थ माध्यमिक विद्यालय केळवडे ता. भोर

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा/९९-२०००दि. २९. २. २०००

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२,३.३ अन्वये श्री. स्वामी समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ, केळवडे ता. भोर संस्थेच्या श्री. समर्थ माध्यमिक विद्यालय केळवडे ता. भोर प्र माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८ वी/ ९xवीx१०xवीxच्या वर्गास १९९ ०/२००० या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९ ९ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे यांची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे या बाबतही अहवाल प्रस्तावा-सोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करुन द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षीत शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन द्यावी.
८] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्यावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.
१३] पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१४] अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर असावा.
१५]

स्वाक्षरीवर दि. ऊ. सं. यांची सही आहे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे १.

प्रत- मुख्याध्यापक श्री. समर्थ माध्यमिक विद्यालय केळवडे ता. भोर

प्र. मुख्याध्यापक,
श्री समर्थ माध्य. विद्यालय,
पो. केळवडे, ता. भोर, जि. पुणे

मुख्याध्यापक
श्री समर्थ माध्य. विद्यालय केळवडे
ता. भोर, जि. पुणे.